महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र :
०२२-२२८१०३९३
ई-मेल :
desk4.labour-mh@gov.in

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक : एफएसी-२०२०/प्र.क्र.१९८/ कामगार-४,          दिनांक:- २३ ऑक्टोबर, २०२०

प्रति,

संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
बांद्रा कुर्ला संकुल,
बांद्रा ( पूर्व ), मुंबई - ४०० ०५१.

**विषय :** कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम १०(२) च्या तरतुदींनुसार प्रमाणकशल्यचिकित्सक यांना प्राधिकृत व प्राधिकृतीचे नूतनीकरण करण्याबाबत...

**संदर्भ :** आपल्या कार्यालयाकडून खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून प्राधिकृत व प्राधिकृतीचे नूतनीकरण करण्याबाबत शासनास प्राप्त झालेले प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या पत्रातील शिफारस विचारात घेऊन **परिशिष्ट -अ येथील एकूण-१८ व परिशिष्ट -ब येथील एकूण-२२** मधील खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जिल्हयासाठी प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून प्राधिकृत व प्राधिकृतीचे नूतनीकरण करण्याबाबत दोन वर्षाच्या कालावधीकरीता खालील अटींच्या अधीन शासन मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.:-

अटी :-

१). अर्जदार हा एखाद्या कारखान्याचा भोगवटादार किंवा त्यात चालणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेत किंवा धंद्यात किंवा त्या कारखान्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही पेटंटात किंवा यंत्र सामुग्रीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने त्यांचा हितसंबंध असलेला किंवा कारखान्यात फॅक्टरी मेडिकल ऑफिसर म्हणून कार्यरत नसावा.

२) अर्जदारास आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाकरीता कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम १० (२) अन्वये प्रमाणक शल्य चिकित्सक म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी केलेल्या तपासणीबाबत मासिक अहवाल फोटोग्राफसह संचालनालयास पुढील महिन्यांच्या १५

तारखेपर्यंत न चुकता सादर करावा व एक प्रत संबंधीत कारखाने व्यवस्थापक यांना द्यावी.

३) अर्जदाराने कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम १० (४) (अ) (ब) व (क), महाराष्ट्र कारखाने नियमावली, १९६३ च्या नियम १८ च्या तरतुदींनुसार कर्तव्ये पार पाडावीत.

४) प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी त्यांना प्राधिकृत केलेल्या कालावधीनंतर काम करु नये. तसेच कार्यक्षेत्राच्या बाहेर त्यांच्या अधिकाराचा वापर केल्यास सदर आदेश रद्द करण्यात येईल.

५) प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी त्यांचे अर्जासोबत जी आवश्यक कागदपत्रे दाखल केली आहेत ती सर्व नियमाप्रमाणे आहे किंवा कसे याची खात्री करावी व त्यापैकी कोणतेही कागदपत्र चुकीचे किंवा अवैध आढळून आल्यास सदरचे आदेश तात्काळ रद्द करावे.

६) प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी तपासणी केल्यानंतर प्रमाणपत्रात खालीलप्रमाणे नमूद करुन किंवा शिक्का मारुन स्वाक्षरी करावी.

**(स्वाक्षरी)**

**कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम १० (२) प्रमाणे**

**---------- जिल्हयाकरीता दिनांक ------------ पासून दिनांक ------------ पर्यंत**

**प्राधिकृत प्रमाणक शल्यचिकित्सक क्रमांक**

७) यापुढे वैद्यकीय तपासणीसाठी शासन जे दर ठरवून देईल तेच दर आकारावेत.

८) अर्जदाराने दिलेल्या माहितीत काहीही बदल झाल्यास त्याने संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांना त्याबाबत १ महिन्याच्या आत कळविणे बंधनकारक राहील.

९) शासनाच्या दिनांक २३.०७.२०१५ च्या पत्रामधील विहीत मुद्दयांच्या व या संदर्भातील सर्व कायदे व नियमांतील तरतूदींचे पालन होण्याचे अनुषंगाने कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संचालकांची राहील.

१०) सदर प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी प्रत्येक वर्षी किती कामगारांची आरोग्य तपासणी केली, त्याची संख्या तव्दत त्यापैकी किती कामगारांना व्यावसायिक आजार (Occupational Disease) व अन्य आजार झाल्याचे आढळले याबाबतचा सविस्तर अहवाल कारखान्यांच्या आस्थापनानिहाय व रुग्णनिहाय संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांना सादर करावा. सदर अहवाल तपासून संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांनी आपल्या अभिप्रायासह प्रतीवर्षी शासनास सादर करावा. त्याशिवाय नुतनीकरणाचा प्रस्ताव पाठविण्यात येवू नये.

११) प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी संचालनालयाने निश्चित केलेल्या अथवा कोणत्या दराने कामगारांची आरोग्य/वैद्यकीय तपासणी केली याबाबत संबंधित कारखाना आस्थापनांकडून माहिती घेऊन त्यासह अहवाल प्रतीवर्षी शासनास संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांनी सादर करावा.

आपला

(रा. शा. कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत-परिशिष्ट- **अ व ब**

e:\backup\dish\प्रमाणक शल्यचिकित्सक व प्राधिकृती देण्याबाबत एकत्रित प्रस्ताव ३.rtf

## परिशिष्ट "अ"

### प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून प्राधिकृत करण्याबाबत.

| अ.क्र. | प्रमाणक शल्यचिकित्सकांचे नांवे | प्राधिकृत जिल्हा |
|---|---|---|
| १ | डॉ. अंजली खाडे | पुणे, सातारा व औरंगाबाद |
| २ | डॉ. पांडूरंग टकले | पुणे |
| ३ | डॉ. पराग गायकी | मुंबई |
| ४ | डॉ. शशिकांत व्यवहारे | पुणे |
| ५ | डॉ. शरद रामचंद्र गुजर | पुणे |
| ६ | डॉ. गणेश सांगळे | नाशिक |
| ७ | डॉ. अशोक कुन्नुरे | पालघर |
| ८ | डॉ. संपदा संपकाळ | अकोला |
| ९ | डॉ. राहूल जावळे | औरंगाबाद |
| १० | डॉ. कल्पेश सुराणा | पुणे व ठाणे |
| ११ | डॉ. अविनाश देशपांडे | औरंगाबाद व पुणे |
| १२ | डॉ. शिवाजी कचरे | पालघर |
| १३ | डॉ. संगीता देवतळे | गोंदिया |
| १४ | डॉ. रमेश अग्रवाल | पालघर |
| १५ | डॉ. प्रियदर्शी हातेकर | पुणे |
| १६ | डॉ. शशिकांत मद्रेवार | पुणे |
| १७ | डॉ. कृष्णकांत पगारे | मुंबई |
| १८ | डॉ.रमेश अग्रवाल | ठाणे |

## परिशिष्ट "ब"

### प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून प्राधिकृतीचे नुतनीकरण

| अ.क्र. | प्रमाणक शल्यचिकित्सकांचे नांवे | प्राधिकृत जिल्हा |
|---|---|---|
| १ | डॉ. स्मिता काळे | पुणे |
| २ | डॉ. सारंग व्यवहारे | औरंगाबाद |
| ३ | डॉ. मिलिंद शिरोडकर | ठाणे |
| ४ | डॉ. अतुल बंड | मुंबई, पालघर व पुणे |
| ५ | डॉ. वर्षा पोतदार | चंद्रपूर |
| ६ | डॉ. उत्तम बाबर | पालघर |
| ७ | डॉ. शीतल कुलकर्णी | सातारा |
| ८ | डॉ. उत्तम बाबर | ठाणे |
| ९ | डॉ. दत्तात्रय गडाख | नाशिक |

| | | |
|---|---|---|
| १० | डॉ. पांडूरंग टकले | औरंगाबाद |
| ११ | डॉ. सुशील पोतदार | पालघर व ठाणे |
| १२ | डॉ. विजया बंड | ठाणे, रायगड व सोलापूर |
| १३ | डॉ. विशाल जाधव | नाशिक |
| १४ | डॉ. उत्तमकुमार शिंदे | रायगड |
| १५ | डॉ. परेशकुमार विसपुते | पुणे |
| १६ | डॉ. वर्षा नागपुरे | रायगड |
| १७ | डॉ. राजेश बरके | नाशिक |
| १८ | डॉ. फैझल देशमुख | मुंबई व रायगड |
| १९ | डॉ. संतोष निंबाळकर | कोल्हापूर |
| २० | डॉ. प्रवीण मोरे | औरंगाबाद |
| २१ | डॉ. अतुल देशपांडे | ठाणे |
| २२ | डॉ. मिलिंद देशपांडे | औरंगाबाद |

***__***